REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# मोरघर येथील मेरूलिंग मंदिर एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप

प्रा.श्री. राजेंद्र कृष्णा देशमुख
संशोधक विद्यार्थी. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

## प्रास्ताविक ः-

सातारा जिल्हयात प्राचीन काळापासून चालत आलेली धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आजही जपलेली दिसून येते. शिवकाळात सातारा हा एक स्वराज्यातील महत्त्वाचे ठिकाण बनला होता. तर पुढे छ.राजाराम महाराजांच्या काळात सातारा हा राजधानी म्हणून अस्तित्वात आला. छ.शाहू महाराजांच्या काळात स्वराज्याची सर्व सूत्रे सातारा येथून हलू लागली होती.पुढे पेशवेकाळात पुण्याचे महत्त्व वाढले व सातारा केवळ छत्रपतीच्या राजधानीचे ठिकाण म्हणून अस्तित्वात राहिले असले तरी धार्मिकदृष्टया महत्त्वाचे ठिकाण टिकून राहिले होते. छ.शाहू महाराजांच्या काळात श्री.बम्हेंद्रस्वामी यांनी फार मोठया प्रमाणावर धार्मिक कार्य केले होते. त्याचेच एक उदाहरण म्हणजे राष्ट्रीय महामार्गावरील आनेवाडी गावापासून पश्चिमेस 10 कि.मी. अंतरावर मेरूलिंगचा डोंगर आहे. या डोंगरावर मेरूलिंगचे मंदिर आहे. हे मंदिर श्री.ब्रम्हेंद्रस्वामींनी बांधले आहे. त्याचीच सविस्तर माहिती या शोधनिबंधात दिलेली आहे.

## मंदिराची स्थापना व रचना -

सातारा जिल्हयातील जावली तालुक्यातील मोरघर याठिकाणी असलेल्या मेरूलिंगच्या डोंगरावर एक महादेव मंदिर आहे. या मंदिराचे बांधकाम छ.शाहू महाराजांचे गुरू श्री.ब्रम्हेंद्रस्वामींनी इ.स.1728 मध्ये बांधले आहे.[1]या मंदिराचे मुखमंडप,मंडप, गर्भगृह व नंदीमंडप असे विधान आहे. या मंदिराचे तीन टप्प्यामध्ये काम झाल्याचे दिसते.

## मुखमंडप:

मुखमंडप हा 14.6 फूट लांबी रूंदीचा असून या मंडपास तीन प्रवेशद्धार आहेत. या प्रवेशद्वारास टोकदार कमान असून त्याची उंची 6फूट व रूंदी 2.6 फूट आहे. या मंडपाच्या भिंती टोकदार कमानींनी बनविलेल्या असून छत स्क्विंचच्या साह्याने गोल मोलीमेवर घुमटाकृती बनविलेले आहे.[2]

## मंडप:

मंडपाची चौकट त्रिशाखी असून ती 4.10 फूट उंच व 3.3 फूट रूंदीची आहे. उंबऱ्यावर किर्तीमुख असून ललाटबिंबावर गणेश पट्टी आहे. या चौकटीवर वेलीची नक्षीकाम केलेले आहे. चौकटीवरटोकदार कमान आहे. मंडप 16 फूट लांबी रूंदीचा असून समोर द्विशाखी तर बाजूस टोकदार कमानी आहेत.[3]बाजूच्या दोन्ही भिंतीमध्ये एक फूट लांबी रूंदीच्या प्रत्येकी दोन खिडक्या आहेत. स्क्विंचचा वापर करून वरील बाजूस अष्टकोनी गोल मोलीमेवर घुमटाकार छत आहे.



## गर्भगृह:

गर्भगृहाची चौकट 4.10 फूट उंच व 3.3 फूट रूंदीची आहे. उंबऱ्याला मांडरिक असून ललाटबिंबावर गणेशपट्टी आहे. चौकटीच्या दोन्ही बाजूस लहान आकाराचे दोन खांब असून त्याची रचना अनुक्रमे खूर, तळखडा, अष्टकोन, गोल, साखळी, गोल,

साखळी, अष्टकोन, चौकोन, तीन टप्प्यांत प्रमाणामध्ये कमी होत जाणारे अष्टकोन, कुंभ व चौकोन अशी आहे. या स्तंभांवरील तुळई वर टोकदार कमानीमध्ये गजलक्ष्मीचे शिल्प आहे. गर्भगृह **19** फूट लांबी रूंदीचे असून मध्यभागी स्वयंभू शिवलिंग आहे.[4] मंडपाप्रमाणे गर्भगृहामध्ये टोकदार कमानीवर स्क्विचंच्या साह्याने अष्टकोनी गोल मोलीमेवर घुमटाकार छत आहे.[5]

## नंदीमंडप:

मंदिराच्यासमोर नंदीमंडप असून **5** फूट लांबी रूंदी व **3** फूट उंचीच्या पीठावर उभारलेला आहे. नंदी **4** फूट लांब, **3** फूट रूंद व **3** फूट उंचीचा आहे. नंदीमंडपाचा वरील भाग नवीन आहे.

## बाह्यभाग:

मंदिर तीन टप्पे असलेल्या पीठावर उभारले आहे. गर्भगृह व जोडून असणाऱ्या पीठाची रचना थोडीशी वेगळी आहे. खूर, कुंभ, उपपीठ व कुंभ मोलीमे अशी पीठाची रचना आहे. मुखमंडपाचे पीठ जमीनीवरोवर आहे. याच्यावर भिंती उभारलेल्या आहेत. पागोळयापर्यंत भिंती साध्या व सरळ आहेत. गर्भगृहाच्या भिंतीमध्ये मधोमध एक कणीचा पट्टा आहे तर मंडपाच्या भिंतीमध्ये चौकोनी पट्टा आहे. गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यावर अष्टकोनी अर्धस्तंभ आहेत. स्तंभाची रचना अनुक्रमे अष्टकोनी खूर, कणी, कुंभ, कणी, अष्टकोन, कणी, कुंभ, कणी व अष्टकोन अशी आहे. त्यावरील हस्तावर पागोळे आहे. गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यावरील हस्ताचा आकार हस्तमुखी आहे. गर्भगृहाला वाहेरून अर्धस्तंभ आहेत. मुखमंडपाच्या कोपऱ्यावर दोन अष्टकोनी स्तंभ पागोळयापर्यंत आहेत. अशाप्रकारचे स्तंभ विरमाडे येथील गणेश महादेव मंदिरास आहेत.[6]

## शिखर:

गर्भगृहाच्या चारी कोपऱ्यावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. मंडपाच्या दोन्ही कोपऱ्यावर मनोरे आहेत. मंडपावरील शिखर तीन टप्प्यात असून गर्भगृह व त्यास जोडून असलेल्या मंडपावर अष्टकोनी शिखर आहे. शिखरावर कमळकळीच्या देठातून वर आलेला आमलकावर आमलकातून वर आलेला कळस आहे. मुखमंडपावरील शिखर आकाराने गोल आहे. पहिला टप्पा साधा आहे. दुसऱ्यामध्ये नक्षीकाम आहे. तिसऱ्या टप्प्यामध्ये ते निमूळते होत गेलेले आहे. वर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती अमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे.

मंडपावरील शिखर अष्टकोनी असून तेही तीन टप्प्यामध्ये आहे. पहिला टप्पा अष्टकोनी पीठाच्या स्वरूपात आहे. त्याचे स्वरूप खूर, उपपीठ, कुंभ मोलीमे असे आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अष्टकोनांच्या आठ कोपऱ्यावर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. आठ पृष्ठभागावर प्रत्येकी चार नागाच्या फणी कोरलेल्या आहेत. याच्यावर अष्टकोनी गोल मोलीमे असून तिसऱ्या टप्प्यामध्ये ते निमूळते होत गेलेले आहे. सर्वात वर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे.

गर्भगृहावरील शिखर अष्टकोनी असून तेही तीन टप्प्यामध्ये आहे. पहिला टप्पा अष्टकोनी पीठाच्या स्वरूपात आहे. त्याचे स्वरूप खूर, उपपीठ, कुंभ मोलीमे असे आहे. आठ पृष्ठभागावर पंचपर्णी कमान असलेल्या प्रत्येकी तीन कमी खोलीचे देवकोष्टके आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये अष्टकोनांच्या आठ कोपऱ्यावर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती अमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. पृष्ठभाग उभा खाचलेला असून त्याच्यावर अष्टकोनी सपाट पट्टा आहे. तिसऱ्या टप्प्यामध्ये ते निमूळते होत गेलेले आहे. सर्वात वर उलटया कमलदलावर कमळदलातून वर आलेले घुमटाकृती आमलकावर उलटया कमळकळीवर देठातून कळस वर आलेला आहे. अष्टकोनाच्या अग्नेय बाजूस बसलेल्या सिंहाचे शिल्प कोरलेले आहे.[7]

## तटबंदी:

मंदिर तटबंदीने बंदिस्त आहे. प्रवेशद्वारापर्यंत पोहोचण्यासाठी **21** पायऱ्या आहेत. प्रवेशद्वारास दोन बुरूज आहेत. टोकदार कमानी असलेले प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस मारूतीच्या डोक्यावर गणपती बसल्याचे शिल्प आहे. दक्षिण बाजूस एक प्रवेशद्वार अस्तित्त्वात असून त्यास आतील बाजूस बहुपर्णी कमान तर बाहेरील बाजूस टोकदार कमान आहे. येथे बसण्यासाठी दगडी बाकाची सोय करण्यात आली आहे. बाकाखाली हस्त आहेत. स्क्विंचच्या साह्याने छत घुमटाकार बनविले आहे. यावर दोन मनोरे आहेत दोन मनोरे पडलेले आहेत. अस्तित्वात असलेल्या तटबंदीच्या आतील बाजूस यात्रेकरूंची सोय केलेली आहे.[8]

## ऐतिहासिक महत्त्व

मेरूलिंग या ठिकाणच्या नरकदेव शब्दाचा अपभ्रंश नरफदेव कैलासपती शंकराच्या वरदहस्ताने नरकासूर दैत्य अति पुंड झाला होता. भगवान श्रीकृष्णानी त्याचा वध केला. म्हणून या ठिकाणास नरकदेव किंवा नरफदेव असे म्हणतात. या गावाला मेरूलिंग असे संबोधले जाते. पुराण काळापासून याला मेरूपर्वत असे म्हणतात. हे मंदिर पांडवांनी बांधले आहे. हे मंदिराच्या रचनेवरून स्पष्ट करता येते. याशिवाय याठिकाणी पांडवांनी पाण्याचे झरे व तीर्थकुंडे बांधली आहेत.

इ.स. **1702** मध्ये कोकणस्थ चिपळूण परशुरामक्षेत्री श्री.ब्रम्हेंद्रस्वामी वास्तव्यास होते. स्वामींना हबशी राजाच्या मुलखातील रयतेने त्रास देण्यास सुरूवात केली. स्वामी हे सातारा प्रांतात जावळीतील घनदाट अशा नरकदेव या ठिकाणी येऊन तपसाधना करू लागले. मेरूलिंगाचे शेजारी एका मोठ्या दगडात कोरलेली गुहा आहे. तेथे स्वामी लोकांना दर्शन देऊ लागले. सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांनी स्वामींचे शिष्यत्व पत्करले. राजकीय सल्ला मसलतीसाठी छत्रपती शाहू महाराज मेरूलिंग येथे स्वामींकडे येत असत.

वसईचा किल्ला जिंकण्यासाठी चिमाजीआप्पा हा श्री.ब्रम्हेंद्रस्वामींचा आशीर्वाद घेण्यासाठी सन **1756** मध्ये आपली स्वारी घेऊन मेरूलिंग महादेव मंदिरात आला होता. त्यांनी वसईचा किल्ला जिंकल्यावर नवस फेडण्यासाठी पुन्हा मेरूलिंगास येऊन **12** मण तीळ, तूप, तांदूळ, चार तोळे केशर इत्यादी देऊन या मंदिरात होमहवन, अभिषेक करून मणभर शोभेच्या दारूगोळयाने आतिषबाजी करून या ठिकाणी वसई किल्ल्यातील भली मोठी घंटा आणून गाभाऱ्यात बांधून घंटानाद केला होता. [82]

## संदर्भ


**1**) तांबे जगन्नाथ दिनकर, परमहंस ब्रम्हेंद्र स्वामी महाराज, श्री देव भार्गवराम देवस्थान कमिटी धावडशी, **18** एप्रिल **1999**, पृ.**48**
**2**) प्लेट क्र. **1**, छायाचित्र क्र. **5**
**3**) प्लेट क्र. **1**, छायाचित्र क्र. **3**
**4**) प्लेट क्र. **1**, छायाचित्र क्र. **6**
**5**) प्लेट क्र. **1**, छायाचित्र क्र. **4**
**6**) प्लेट क्र. **1**, छायाचित्र क्र. **6**
**7**) प्लेट क्र. **1**, छायाचित्र क्र. **5**
**8**) प्रत्यक्ष पाहणी व वर्णन, दि.**22** डिसेंबर, **2018**, वेळ : दुपारी **4.00** वाजता
**9**) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, **2011**, पृ. **124**


LBP PUBLICATION